**कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे), इमारत परवानगी कक्ष, बृहन्मुंबई क्षेत्र,**
**खोली क्र. ३९-४१, तळमजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१.**

जा.क्र.: का.अ. (पू.उ.)/इपक/बृ.क्षे./म्हाडा/ET-903/२०२३
दिनांक :- 02 JUN 2023

**प्रति,**

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, म्हाडा,
पहिला मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**विषय :-** नेहरु नगर, कुर्ला (पूर्व) येथील इमारत क्र. **६९, नेहरु नगर श्री सिध्दी सह.गृह.नि.संस्था मर्या.,** येथील न.भू.क्र. १२ (भाग), मौजे कुर्ला-३, नेहरु नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०० ०२४ या इमारतीच्या पुर्नविकासाबाबत.

**संदर्भ :-**
१. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.टीपीएस-१८२०/अ नै २७/प्र.क्र. ८०/२० नवि-१३, दि. १४.०१.२०२१.
२. म्हाडा परिपत्रक क्र. एम.एच./मुं.मं.-२/उप. मुख्य अ./इ.प.क./बृ.क्षे./प्रा./ ईटी-४५४/२०२१, दि. २३.०२.२०२१.
३. मुंबई मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र क्र. सीओ/एमबी/आरईई/एफ-८५२/ ११६७/२०२१, दि. २५.०५.२०२१.
४. विकासक, मे. हिरानी मंथन बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स यांचे दि. २९.०५.२०२३ रोजी सादर केलेले हमीपत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाला अनुसरुन संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णय व संदर्भ क्र. २ च्या म्हाडा प्राधिकरणाच्या परिपत्रकान्वये विषयांकित प्रकल्पाकरिता विकासकास फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकापोटी आकारण्यात येणाऱ्या अधिमुल्याच्या बाबतीत ५०% सुट देण्यात आलेली आहे. या करीता मे. हिरानी मंथन बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स यांना विषयांकित प्रकल्पातील बांधकामासाठी अधिमुल्यामध्ये सुट घेतली आहे. या प्रकल्पातील EWS/LIG/MIG/HIG क्षेत्रातील घरे/सदनिका/वाणिज्यिक-औद्योगिक इतर गाळे घेणाऱ्या ग्राहकांचे देय मुद्रांक शुल्क विकासकांनी (मे. हिरानी मंथन बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स) यांनी भरणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ विकासकांना मिळालेला आहे.

विषयांकित इमारतीच्या पुनर्विकासाच्या आराखड्यांना मंजूरी देताना विकासक मे. हिरानी मंथन बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स यांना दि. १४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण **२५८.१८ चौ.मी.** (निवासी वापर) करिता फंजिबल अधिमुल्य रकमेवर ५०% सुट देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने विकासकांनी **२६३.४४ चौ.मी.** (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीता खालील बाबींची पुर्तता करावयाची आहे.

I. या योजनेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या प्रकल्पांकरीता संबंधित विकासकाने ग्राहकांचे पूर्ण मुद्रांक शुल्क भरण्यात येणार असल्याचे हमीपत्र नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

II. अशा प्रकल्पामधील मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासकामार्फत करण्यात आला असल्याने लाभार्थी ग्राहकाचे प्रमाणपत्र विकासकास नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

III. विकासकाने ज्या ग्राहकांच्या अशा प्रकारे मुद्रांकांचा संपूर्ण खर्च केला आहे, त्यांची यादी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी लागेल.

IV. जे प्रकल्प या योजनेत सहभागी होतील त्या प्रकल्पांची अथवा प्रकल्पांच्या ज्या भागासाठी सवलत घेतली आहे त्याची यादी, महानगरपालिका आयुक्त / नगरपरिषद अथवा नगरपंचायत मुख्याधिकारी / जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण यांच्यामार्फत माहितीकरीता मुद्रांक नोंदणी कार्यालयास कळवावी लागेल. तसेच संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करावी लागेल.

त्यानुसार विकासकांनी **२६३.४४ चौ.मी.** (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या ०६ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करणे आवश्यक आहे. सदर इमारतीत विकासकामार्फत ०१ सदनिकांची विक्री करण्यात आली आहे. सदर ०१ सदनिकांच्या विक्री कराराकरीता मुद्रांक शुल्काचा भरणा विकासकाने केल्याबाबत हमीपत्र सादर केले आहे तसेच उर्वरित ०५ निवासी सदनिकांची विक्री करण्यात आली नसल्याने सदर ०५ निवासी सदनिकांची विक्री करण्यात येईल त्यावेळी सदर विक्री कराराकरीता मुद्रांक शुल्काचा भरणा विकासकाने करावयाचे आहे, याबाबत विकासकाने दि. २९.०५.२०२३ रोजीचे हमीपत्र सादर केले आहे. विकासकाने ०१ सदनिकांचे सह दुय्यम निबंधक, कुर्ला १, यांचेकडे विक्री करारनामा नोंदणी केलेल्या ग्राहकांचे प्रमाणपत्र व सूची क्र. २ या कार्यालयाकडे सादर केलेली आहे. उर्वरित ०५ लाभार्थी ग्राहकांचे मुद्रांक शुल्क विकासकाकडून भरणा करण्याबाबत हमीपत्र विकासकाने सादर केलेले आहे. सदर ०६ सदनिकांचा तपशील खालील प्रमाणे असून सोबत परिशिष्ट-अ मधील माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**सोबत :-** परिशिष्ट-अ

आपला विश्वासू,

कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष / म्हाडा

**प्रत :-** मा. उपमुख्य अभियंता / इपक / प्रा. यांना माहितीकरीता.

**परिशिष्ट - अ**

नेहरु नगर, कुर्ला (पूर्व) येथील इमारत क्र. **६९, नेहरु नगर सागर सह.गृह.नि.संस्था मर्या.**, येथील न.भू.क्र. १२ (भाग), मौजे कुर्ला-३, नेहरु नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०० ०२४ या इमारतीच्या पुनर्विकासामधील खालील सदनिकांच्या विक्री करारावर मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासक, मे. हिरानी मंथन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांचे मार्फत करण्यात आला आहे. सदर लाभार्थी ग्राहकाची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **सदनिका क्रमांक** | **बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी.** | **विक्रीबाबत सद्य:स्थिती** |
|---|---|---|---|
| १ | सदनिका क्र. १८०३ | ३१.२० | Mrs. Neha Manojkumar Hir & Mr. Manojkumar W. Hire यांना विक्री करण्यात आला आहे |
| २ | सदनिका क्र. १९०१ | ६३.०० | विक्री करण्यात आलेले नाही |
| ३ | सदनिका क्र. १९०२ | ६४.७० | विक्री करण्यात आलेले नाही |
| ४ | सदनिका क्र. १९०३ | ३१.२० | विक्री करण्यात आलेले नाही |
| ५ | सदनिका क्र. १९०४ | ३९.७१ | विक्री करण्यात आलेले नाही |
| ६ | सदनिका क्र. १९०५ | ३३.६३ | विक्री करण्यात आलेले नाही |
| | **एकूण =** | **२६३.४४** | |

कार्यकारी अभियंता(पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष/म्हाडा